जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१३/०९/२०२३
## दि.१२/०९/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ६४५/२०२३,भादविक ३०२,महा.पो.का.क.३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | सोनाली साडेकर,वय ३६ वर्षे,रा.समृध्दी अपार्टमेंट,लक्ष्मीनगर,बाणेर,पुणे |
| **आरोपीत** | हेमंत रत्नाकर काजळे,वय-४० वर्षे,रा.समृध्दी अपार्टमेंट,लक्ष्मीनगर,बाणेर,पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/०९/२०२३ रोजी सकाळी १०/३० वा.समृध्दी अपार्टमेंट,फ्लॅट नं.२०१,लक्ष्मीनगर, बाणेर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे भाऊ नमुद इसम हेमंत काजळे याने फिर्यादी यांचे पती धनंजय पदमाकर साडेकर,वय-३८ वर्षे,रा.सदर यास त्यांचेमध्ये झालेल्या घरगुती वादाचे कारणावरुन, त्याचे डोक्यात लोखंडी रॉडने मारून,त्यास गंभीर जखमी करून जीवे ठार मारले. तसेच हेमंत काजळे याने नमुद ठिकाणी स्वतः गळफास घेवुन आत्महत्या केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बालाजी पांढरे ९८२३०५५३६९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ४३६/२०२३,भादविक ३२४,३२३,५०४,आर्म ॲक्ट कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | मयुर निवंगुने,वय-२१ वर्ष,रा.पवित्र अर्पाटमेंट,जाधवनगर,रायकर मळा,धायरी,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/०९/२०२३ रोजी सकाळी ११/३० वा.एशियन कॉलेज,नऱ्हे,धायरी रोड,धायरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे कॉलेज मधील त्यांचे ओळखीचा मित्र यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचे जवळ येवुन,फिर्यादीस शिवीगाळ करून,तुला लय माज आलाय का,तु माझेकडे काल कॉलेज मध्ये रागाने का बघीतलेस असे म्हणुन हाताने मारहाण करुन,त्याचे बॅगेतुन लोखंडी कोयता बाहेर काढुन,फिर्यादी यांचे डावे पायाचे गुडघ्यावर लोखंडी कोयता उलटा मारुन त्यांना जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, खटावकर ९३७०९६२२२७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १३६५/२०२३,भादविक ३०६,५०४,५०६,५०७,३४ |
| **फिर्यादी** | मनिषा कुटे,वय-३२ वर्षे,रा.कुंजीरवस्ती,मांजरी-बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०९/२०२३ रोजी सकाळी ०९/३० वा ते १०/०० वा.चे दरम्यान बनसोडे यांचे घरी भाडयाने सर्वे न.१८१,बी,कुंजीरवस्ती,मांजरी-बुद्रुक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पती विजयकुमार कुटे वय-४३ वर्षे यांना जुन २०२३ ते आजपर्यंत यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,त्यांचेमध्ये वाडेगाव रोड,वाडे बोलाई,केसनंद पुणे येथे |

| | |
|---|---|
| | असलेल्या झालेल्या जागेचे व्यवहारातुन,त्यांना सतत फोनवर धमकी देवुन मिटिंग करून, मानसिक त्रास देवुन,त्यांचेवर दबाव आणुन,त्यांना मानसिक त्रास देवुन,विजयकुमार कुटे यांना हॉलचे फॅनचे हुकला दोरीच्या सहाय्याने गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे), विश्वास डगळे ७०४५३७९७०७ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ४७५/२०२३,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-१८,रा.विमाननगर,पुणे |
| **आरोपीत** | गोपाल हिराराम धारु,वय-१९ वर्ष,रा.खराडी गाव,चंदननगर,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०९/२०२३ रोजी १२/०५ वा. गेरा टेरेस सोसायटी विमाननगर पुणेचे मेन गेट समोरील रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते ठिकाणी सोसायटीचे गेट जवळ व्हॉटसअॅप चॅटिंग करीत थांबलेले असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे जवळील १६,२००/- रु किचा मोबाईल फोन जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. चंदन ८२७५५२२६९७ / ८३५५९१७६३१ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५७८/२०२३,भादविक २७९,३०४(अ),३३८,मो.वा.कायदा कलम १८४ |
| **फिर्यादी** | नितीन गवते,वय-३६ वर्षे,रा.पुनावळे,बोंडवे चाळ,पुणे |
| **आरोपीत** | अॅम्ब्युलन्स कारवरील चालक (गंभीर जखमी असुन,त्याचेवर उपचार चालु आहे.) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/०९/२०२३ रोजी रात्रौ ०२/३० वा. कात्रज बोगदा पुढे दरी पुलाचे पुढे जांभुळवाडी रोडवर,आंबेगाव-बुद्रुक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी त्यांचेकडील ट्रक हा मुंबईकडे घेवुन जात असताना,यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील अॅम्ब्युलन्स कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी अॅम्ब्युलन्स कारची फिर्यादी यांचे ट्रकला धडक देवुन, सदर अॅम्ब्युलन्स कार मधील रूग्ण किरण अवताडे,वय-१४ वर्षे यास अपघाता मध्ये गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. तसेच अॅम्ब्युलन्स इतर अनिता अवताडे,अंकुश अवताडे,सुखदेव अवताडे यांना गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मोहन देखमुख ९७६५३९०९४३ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ९२८/२०२३,भादविक २७९,३३७,३३८,३०४(अ),मोव्हेअॅक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | संभाजी रोकडे,वय-३९,रा.मुं.पो.जासई,उरण,जि.रायगड |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०९/२०२३ रोजी पहाटे ०३/४० वा.कात्रज-कोंढवा बायपास रोडवरील खडी मशीन पोलीस चौकी समोरील रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा कंटेनर चालवित घेवुन जात असताना,यातील नमुद इसमाने त्याचे मोटार सायकलवर त्याचे इतर दोन मित्रांना ट्रिपलसिट घेवुन जात असताना,त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी त्याची मोटार सायकल फिर्यादी यांचे कंटेनरला पाठीमागुन धडक देवुन,त्याचा मित्र अनिल निलेश पातलावत,वय-२१,रा.टिळेकरनगर,कोंढवा,पुणे यास गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. तसेच त्याचा दुसरा सहकारी मित्र गणेश जाधव,वय-१८ हा गंभीर जखमी झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, रासकर ८६८९९४५९९९ |

## दि.१३/०९/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ९३६/२०२३,भादविक ३०७ |
| **फिर्यादी** | विष्णु शिवशरण,वय-४३ वर्षे,रा.सुखसागरनगर,पुणे |
| **आरोपीत** | सिक्युरीटी गार्ड इसम (अटक नाही) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/०९/२०२३ रोजी ०८/३० वा.शांतीनगर सोसायटी कोंढवा-बुद्रुक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे मेहुणे सुधीर मलेश बनसोडे याची के.एस.एम.एस. नावाची सिक्युरीटी एजन्सी आहे. सुधीर बनसोडे हे शांतीनगर सोसायटी कोंढवा-बुद्रुक,पुणे येथे असलेले त्याचे सिक्युरीटीचे गार्ड चेक करण्यासाठी गेले असताना,त्याचेकडे सिक्युरीटी गार्ड म्हणुन असलेला यातील नमुद इसम हा सदर ठिकाणी दारु पिऊन त्याची डयुटी करीत होता. त्यामुळे सुधीर बनसोडे याने त्यास कामावरुन काढुन टाकल्याचा राग मनात धरुन,त्याने सुधीर बनसोडे यास लाकडी बांबुने पायावर,हातावर,पाठीवर तसेच डोक्यावर जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने,त्यास गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, राजेश उसगावकर ७३५०५४७०००७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**